नोंदणीकृत गलिच्छ वस्तीत १५ मि. मि. व्यासाच्या पाण्याच्या जोडणीसाठी खालीलप्रमाणे दर आकारण्यात येतील :–

| घराचा प्रकार | दर |
|---|---|
| कॉंक्रीटचे छप्पर नसलेले .. .. .. | रुपये २५ |
| कॉंक्रीटचे छप्पर असलेले .. .. .. | रुपये ५० |

दर प्रतिमाह प्रति एकक (गाळा) असतील.

परंतु, ग्राहकांनी ३१ डिसेंबर २००२ पूर्वी जर मिटर जोडून घेतले नाही तर दिनांक संपल्यानंतर मिटररहित जोडणीस वरील दराच्या तिप्पट दर आकारले जातील. ''

(क) मिटरद्वारे अथवा मिटरशिवाय जे इमारती अथवा जमीनधारक महानगरपालिकेच्या पाईपलाईनद्वारे पाणी प्राप्त करीत नाही त्या इमारत अथवा जमिनी धारकांना वार्षिक भाडे मुल्याधारित खालीलप्रमाणे आम पाणी दर आकारले जातील :–

| वार्षिक भाडेमुल्य (रुपयांत) | वार्षिक दर |
|---|---|
| १ ते १९९ .. .. .. | ३० % |
| २०० ते १००० .. .. .. | ३५ % परंतु कमीत कमी रुपये ६०० प्रति एकक (गाळा) |
| १००१ च्या वर .. .. .. | ४० % परंतु कमीत कमी रुपये १२०० प्रति एकक (गाळा) |

३. मुख्य उपविधीच्या उपविधी ९ च्या ऐवजी पुढील उपविधी समाविष्ट करण्यात यावा.

'' ९ (अ) (१) मिटरद्वारे पाणी पुरविण्यात येणाऱ्या निवासी इमारती, जमिनी आणि अनिवासी ग्राहक, उदा. गठई कामगार, सायकल दुरुस्ती दुकान, जनरल स्टोर्स, किराणा दुकान, टेलरिंग दुकान, टेलिफोन बुथ्स, पिठाची गिरणी, औषधी दुकान, दैनिक गरजा, फर्निचर दुकान, फेब्रिकेशन दुकान, भाजीपाला दुकान, झेरॉक्स सेंटर, सल्ला केंद्रे, ईस्तरी दुकान, लाकडाचे टाल इत्यादींना (वसाहतींना वगळून) खालीलप्रमाणे दर आकारण्यात येतील :--

| | |
|---|---|
| पहिल्या १०,००० लिटर्ससाठी .. .. | रुपये ३ प्रति १,००० लिटर्स दराने |
| पुढील ३०,००० लिटर्स .. .. .. | रुपये ३.५० प्रति १,००० लिटर्स दराने |
| आणि अधिक .. .. .. | रुपये ४.०० प्रति १,००० लिटर्स दराने. |

कमीतकमी ३० दिवस किंवा प्रतिमाहसाठी खालीलप्रमाणे दर असतील :–

| जोडणीचा व्यास | दर |
|---|---|
| १५ मि. मि. .. .. .. | रुपये ५० |
| २० मि. मि. .. .. .. | रुपये २०० |
| २५ मि. मि. .. .. .. | रुपये ५०० |
| ४० मि. मि. .. .. .. | रुपये १,००० |
| ५० मि. मि. .. .. .. | रुपये २,५०० |
| ८० मि. मि. .. .. .. | रुपये ८,००० |
| १०० मि. मि. .. .. .. | रुपये ९,००० |
| १५० मि. मि. .. .. .. | रुपये १५,००० |
| २०० मि. मि. .. .. .. | रुपये ३०,००० |
| २५० मि. मि. .. .. .. | रुपये ५०,००० |
| ३०० मि. मि. .. .. .. | रुपये ६०,००० |

फ्लॅट पद्धतीसाठी कमीत कमी दर रुपये ५० प्रती फ्लॅट किंवा प्रत्यक्ष वापर यातील जे जास्त असेल ते आणि त्या आकारणीच्या अधिक मिटर भाडे जादा आकारण्यात येईल.

(२) मिटरद्वारे पाणीपुरवठा होणाऱ्या शैक्षणिक संस्थांना जोडलेली रुग्णालये, क्रीडा संस्था, संस्थांना जोडलेल्या वसाहती, हवाई व्यवस्थापन, लष्करी तांत्रिक सेवा, शासन रेल्वे विद्युतीकरण, पोहण्याचे तलाव, सार्वजनिक उपक्रमाच्या वसाहती, वसतिगृहे आणि खाटांची व्यवस्था नसलेली रुग्णालये आणि उपविधी ९ (अ) (१) आणि ९ (ब) मधील वर्गवारी वगळून ३० दिवस किंवा प्रतिमाह किंवा त्याच्या भागासाठी रुपये १२ प्रति १,००० लिटर्ससाठी आकारण्यात येतील.

३० दिवस किंवा प्रतिमाह यासाठी खालीलप्रमाणे कमीत कमी दर आकारण्यात येतील :–

| जोडणीचा व्यास | दर |
|---|---|
| १५ मि. मि. | रुपये ५०० |
| २० मि. मि. | रुपये ८०० |
| २५ मि. मि. | रुपये ३,५०० |
| ४० मि. मि. | रुपये ४,५०० |
| ५० मि. मि. | रुपये ९,००० |
| ८० मि. मि. | रुपये ११,००० |
| १०० मि. मि. | रुपये १९,००० |
| १५० मि. मि. | रुपये २३,००० |
| २०० मि. मि. | रुपये ४५,००० |
| २५० मि. मि. | रुपये ७०,००० |
| ३०० मि. मि. | रुपये ९०,००० |

वरील आकारणीखेरीज मिटर भाडे अतिरिक्त आकारले जाईल. ''

(ब) मिटरद्वारे पाणीपुरवठा होणारी दारुची दुकाने, वनस्पती फॅक्टरीज, ब्युटी पार्लर्स, उत्तेजक पेय दुकान, औषधनिर्मिती काम, बियर बार, देशी दारुचे दुकान, सिनेमा गृहे, रंगमंदिरे, बर्फ फॅक्टरी, शीतगृहे प्लॅन्ट्स, फोटो स्टुडिओ, सोडावॉटर प्लॅन्ट, बँक इमारती, मंगल कार्यालये, पेट्रोल पंप, ॲटोमोबाईल सर्व्हिस सेंटर्स, अन्न आणि फळे प्रक्रिया केंद्रे, वातानुकूलित प्लॅन्ट्स, दुग्ध योजना, डेअरी, सर्व प्रकारच्या फॅक्टरीज, इमारती बांधकाम आणि खाटांची रुग्णालये यासाठी ३० दिवस किंवा प्रतिमाह किंवा त्याच्या भागासाठी रुपये २० प्रति १००० लिटर्स दर आकारला जाईल.

३० दिवस किंवा प्रतिमाह यासाठी खालीलप्रमाणे कमीत कमी दर आकारले जातील :–

| जोडणीचा व्यास | दर |
|---|---|
| १५ मि. मि. | रुपये १००० |
| २० मि. मि. | रुपये २००० |
| २५ मि. मि. | रुपये ५००० |
| ४० मि. मि. | रुपये १०००० |
| ५० मि. मि. | रुपये १४००० |
| ८० मि. मि. | रुपये १८००० |
| १०० मि. मि. | रुपये २५००० |
| १५० मि. मि. | रुपये ४०००० |
| २०० मि. मि. | रुपये ६०००० |
| २५० मि. मि. | रुपये १००००० |
| ३०० मि. मि. | रुपये १२०००० |

वाणिज्यिक उपयोगाच्या फ्लॅट पद्धतीसाठी वरीलप्रमाणे कमीत कमी दर प्रति एकक (गाळा) आणि त्याखेरीज मिटरभाडे अतिरिक्त आकारले जाईल.